# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 15 May 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १५ मे २०२५ दुपारी १.०० वा.

****

ऑपरेशन सिंदूर म्हणजे दहशताविरोधातलं सगळ्यात मोठं पाऊल असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. भारत पाकिस्तान यांच्यातील संघर्ष आणि दहशतवादी कारवायांच्या पार्श्वभुमीवर राजनाथ सिंह आज सकाळी जम्मू आणि काश्मीर दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी श्रीनगरमधील बदामी बाग इथल्या सैनिकांना संबोधित केलं.

पाकिस्ताननं भारताच्या शिरावर वार केला, प्रत्युत्तरादाखल आपण त्यांच्या छातीवर वार केला, पाकिस्तान आजही भारताला धोका देत असल्याचंही ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरदरम्यान सैनिकांच्या शौर्य आणि संयमाला संपूर्ण देश सलाम करतो, देशाला सैनिकांचा अभिमान आहे, असं सांगून हुतात्मा झालेल्या सैनिकांना त्यांनी श्रध्दांजली वाहिली. ऑपरेशन सिंदूरनंतर संरक्षणमंत्री प्रथमच जम्मू काश्मीर दौऱ्यावर आहेत. या भेटीत ते बैठक घेऊन जम्मू काश्मीरच्या सुरक्षेचा आढावाही घेणार आहेत.

****

ऑपरेशन सिंदूरच्या पार्श्वभूमीवर भारतीय सैन्याचा सन्मान, आणि शूरवीरांना मानवंदना देण्यासाठी भारतीय जनता पक्षातर्फे देशभरात तिरंगा यात्रा सुरु आहे. २३ मेपर्यंत ही यात्रा सुरू राहणार आहे. राजधानी दिल्लीत कर्तव्य पथावर आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठ– जेएनयूमध्ये तिरंगा यात्रा सुरु आहे. तर जम्मू काश्मीरमध्ये आज तिरंगा यात्रा पार पडली.

दरम्यान, बीड जिल्ह्यात परळी इथं आज भव्य तिरंगा रॅलीचं आयोजन करण्यात आलं आहे. या रॅलीत सर्व नागरिकांनी उत्साहाने सहभागी होण्याचं आवाहन भाजप शहराध्यक्षा उमा समशेट्टे यांनी केलं आहे.

****

अहिल्यानगर जिल्ह्यातील कोपरगाव इथंही सैनिकांचं मनोबल वाढवण्यासाठी आणि हुतात्म्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी भव्य तिरंगा मशाल यात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. या यात्रेत असंख्य नागरिक, आमदार आशुतोष काळे आणि माजी आमदार स्नेहलता कोल्हे यांच्यासह अनेक पक्ष कार्यकर्तेही सहभागी झाले होते.

****

भारत आणि पाकिस्तानमधील अलिकडच्या संघर्षविरामानंतर, जम्मू आणि काश्मीरमध्ये, श्री माता वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी आता भाविक हळूहळू येऊ लागले आहेत. श्री माता वैष्णोदेवी श्राइन बोर्डानं भाविकांच्या सोयीसाठी उपाययोजना सुरु केल्या आहेत तसंच जम्मू विमानतळावरून उड्डाणे सुरू झाल्यानं श्राइन बोर्ड ऑनलाइन नोंदणी आणि प्रत्यक्ष नोंदणीद्वारे हवाई प्रवासाची सुविधा देखील प्रदान करत आहे, यामुळे भाविकांची संख्या आणखी वाढणार असल्याचं आमच्या बातमीदारानं सांगितलं.

****

उत्तरप्रदेशची राजधानी लखनऊ इथं धावत्या बसमध्ये भीषण आग लागून पाच जणांचा मृत्यू झाला. मृतात दोन मुलांचाही समावेश आहे. आज पहाटे ही घटना घडली. ही बस बिहारहून दिल्लीला जात असताना लखनऊच्या मोहनगंजजवळ किसानपथ इथं ही दुर्घटना घडली. ही घटना घडली त्यावेळी बसमधील जवळपास ७० प्रवासी झोपेत होते. आपत्तकालीन दरवाजा न उघडल्यानं मागील सीटवर असलेल्या प्रवाशांना बाहेर येता न आल्यानं ते आगीत होरपळल्याचं लखनऊ पोलिसांनी सांगितलं आहे.

****

आज १५ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कुटुंब दिन म्हणून ओळखला जातो. बदलत्या जीवन शैलीत आपले प्राधान्यक्रम बदलले आहेत. शहराच्या तुलनेत ग्रामीण भागात कुटुंब व्यवस्था काहीशी बळकट असल्याचं दिसून येतं. बदलत्या नागरीकिकरणाचा परिणाम नात्यांवरही होताना दिसत आहे.

मोबाईल आणि संवादमाध्यमांच्या प्रगत काळात नव्या पीढितील मुलांना नात्यांची जाणीव करुन देणं गरजेचं आहे. एकत्र येऊन परस्पर संवाद वाढावा, यासाठी प्रयत्न करणं आवश्यक असल्याचं पुणे जिल्हा न्यायालयाच्या वरिष्ठ कौटुंबिक समुपदेशक डॉक्टर स्मिता जोशी यांनी आकाशवाणीशी बोलताना म्हटलं आहे.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि संगणक तंत्रज्ञान क्षेत्रातली आयबीएम कंपनी आणि यशस्वी स्किल्स लिमिटेड यांच्यात रोजगाराभिमुख अभ्यासक्रम अंमलबजावणीसाठी नुकताच सामंजस्य करार झाला. या करारामुळे मुक्त विद्यापीठाच्या लाखो विद्यार्थ्यांना पारंपारिक शिक्षणाबरोबरच रोजगाराभिमुख संगणकीय कौशल्य आधारित शिक्षण मिळणार आहे, अशा माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनावणे यांनी दिली.

विद्यापीठातील बीए, बीकॉमसह बिगर तांत्रिक अभ्यासक्रमांची रोजगार क्षमता वाढवण्यासाठी हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. या सामंजस्य करारामधून आयबीएम सर्टिफिकेशन बीए, बीकॉमसह विविध विषयातील विद्यार्थ्यांसाठी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध असेल, हे अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विद्यार्थी रोजगारक्षम व्हावेत असा यामागील मुख्य हेतू आहे.

****

हवामान –

विदर्भ, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दरम्यान, काल महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत वादळी पाऊस झाला. अकोला जिल्ह्यात मूर्तिजापूर आणि अकोट तालुक्यात वादळी वाऱ्यासह जोरदार पावसामुळं काही ठिकाणी फळबागांना फटका बसला आहे. सांगली जिल्ह्यातील अनेक तालुक्यांना मुसळधार पावसानं झोडपलं. तर राज्यात काल सर्वाधिक ४२ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस तापमान ब्रह्मपुरी इथं नोंदवलं गेलं. मराठवाड्यात परभणी इथं ३६, छत्रपती संभाजीनगर इथं ३६ पूर्णांक आठ, तर बीड इथं ३८ पूर्णांक दोन दशांश सेल्सिअस अधिक तापमानाची नोंद झाली आहे.

****